**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# शिक्षक बांधिलकी

**दिपक चव्हाण[1], Ph. D. & करुणादेवी भास्कर राऊत[2]**

***[1]टिळक शिक्षण महाविधालय पुणे***

***[2]धारेश्वर शिक्षणशास्त्र महाविधालय पुणे***

**Abstract**

*प्रस्तुत संशोधन पर लेखात बांधिलकीची संकल्पना, शिक्षक बांधिलकी संकल्पना, शिक्षक बांधिलकीची तात्वीक पार्श्वभूमी, शिक्षक बांधिलकीचे पाचक्षेत्रे विदयार्थाशी बांधिलकी, समाजाशी बांधिलकी, व्यवसायाशी बांधिलकी, उत्कृष्टतेशी बांधिलकी, मूल्याशी बांधिलकी या क्षेत्रांवावत विश्लेषण करण्यात आले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक**

**आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये शिक्षकाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.प्राचीन काळापासून गुरूला श्रेष्ट स्थान दिले आहे.शिक्षकाचा आदर आणि प्रातिष्ठा अशी आपली परंपरा आहे. ही परंपरा प्राचीन काळापासून आजपर्यंत चालत आलेली आहे. जशी समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे व समीकरणे बदलत गेली तसतशी शिक्षकांची भूमिका व जबाबदाऱ्या बदलत गेल्या.**

**प्राचीन काळापासून शिक्षकी पेशाचा विचार केला तर असे दिसून येते की,**

**शिक्षक मोबदल्याची अपेक्षा न करता निस्वार्थी भावनेने शिक्षणाचे कार्य करत असत. प्राचीन काळी गुरुकुल पद्धती होती. गुरुगृही जावून विधार्थी ज्ञान मिळवत असे. आपल्या विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करणे, चारित्र्य संपन्न बनवणे ही कार्यप्राचीन काळापासून गुरुअत्यंत निरलसपणे करीत असत. स्वतःलादून घेतलेल्या नितीनियमांचे पालन स्वतःगुरुच अगदी काटेकोरपणे करीत असत. आपले विद्यार्थी सर्वार्थाने घडविणे हे ध्येय त्यांच्या समोर होते. जीवनानुभव व स्वतःचा आदर्शयातून विद्यार्थ्यांची जडणघडण केली जात असे. म्हणूनच प्राचीन गुरु हे केवळ आपल्या शिष्यांना किंवा सामान्य जनतेलाच पूजनीय वंदनीय नव्हते तर राजे-महाराजे, सम्राट,यांना सुद्धावंदनीय होते. राज्यकर्ते ,राजेगुरूंना देवांच्या स्थानी मानून त्यांच्या मार्गदर्शनाने राज्य चालवित असत. प्राचीन गुरु**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

फक्त विद्यार्थ्यांची जडण-घडण करण्याकडेच लक्ष देत असत. असे नव्हे तर ते समाजाचे वैचारिक नेतृत्वही करत असत. समाजाला देशाला योग्य दिशा देण्याचे कार्य करत असे, मध्ययुगीन कालखंडात देवालये, विहार, चर्च, मदरसा शिक्षणाची केंद्रे बनली धर्मगुरू व पुरोहित धार्मिक स्थळीच ज्ञान दानाचे पवित्र कार्य करत करीत असत. समाजाकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता नवीन पिढी घडविणे आणि सामान्य जनतेचे उदबोधन करण्याचे कार्य करीत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी, परकीय सत्ता संपुष्टात आणण्यासाठी सामाजिक व राजकीय जागृती करण्यात शिक्षकांनी पुढाकार घेतला. ज्योतिबा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, विद्यानंद सरस्वती, धोंडो केशव कर्वे, पंडित विद्यासागर या आधुनिक गुरुनीच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोलाचे कार्य केले. राष्ट्रीय शाळा सुरू करुन मुलांच्या व जनतेच्या मनात इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण कारण्याचे काम केले.स्वदेशी, स्वभाषा याविषयी अभिमान जागृत केला. स्वातंत्र्य मिळविण्यात शिक्षकांचे महत्त्व पूर्ण योगदान आहे. प्राचीन काळापासून तर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत शिक्षण व्यवसायाला श्रेष्ठ दर्जा प्राप्त झालेला होता. कारण तत्कालीन शिक्षकाच्या अंगी असलेल्या या गुणवैशिष्ट्यांमुळे शिक्षण व्यवसायाचे श्रेष्ठत्व व महत्त्व सिद्ध होत होते. कुशाग्र बुद्धिमत्ता, प्रगाढविद्वत्ता, ज्ञानार्जनाची लालसा, ज्ञान दानाची तळमळ, निष्कलंक चारित्र्य, तेजस्वी व्यक्तिमत्व, समाज हितदक्ष, विशालदृष्टी, जीवन मूल्यांवर श्रद्धा, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम व आपुलकी, त्याग, निस्वार्थी वृत्ती, असा अनेक गुणांनी संपन्न शिक्षक हे समाजाला हवेहवे असतात. शिक्षकाला सामाजिक जबाबदारीची जाणीव हवी, आत्मभान हवे, शिक्षकाने समाजाचे वैचारिक नेतृत्व करावे. समाज प्रबोधनाचेही कार्य करावे. त्यांचा विचार व आचार यांच्यात समन्वय असावा. समाजमनात शिक्षकांबद्दल आत्यंतिक आदराची व कृतज्ञतेची भावनेची जपणूक शिक्षकाने करावी. कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनांना बळी न पडता निर्व्याज्यपणे आपले कार्य करीत राहावे .

अलीकडचे काळात शिक्षणातील राजकीय व सामाजिक हस्तक्षेपामुळे शिक्षक व शिक्षण व्यवसायाचे स्थान व श्रेष्ठत्व पूर्णपणे अबाधित राहिलेले आपल्याला दिसत नाही, आजच्या शिक्षण सम्राटांच्या

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अर्थकारणामुळे ते अधिक ढासळले आहे. वेतन व्यतिरिक्त अन्य मार्गाने पैसा कमविणे, वर्गात नीट न शिकवता खाजगी शिकवण्या चालवण्यात पटाईत असलेल्या शिक्षकांची संख्या वाढत चालली आहे. त्यात भर संस्था चालकांची पडलेली आहे भरपूरलाच घेऊन शिक्षकांची नेमणूक करणे, शिक्षकांना स्वतःच्या कामासाठी व राजकीय प्रचारासाठी गुंतवणे याबाबींचा ही फारमोठ्या प्रमाणावर शिरकाव झालेला आहे. शिक्षकाच्या चारित्र्याच्याबाबत तर आनंदी आनंदच आहे. हे जरी सत्य असले तरी सर्वच शिक्षकांनी ताळ तंत्र सोडलेले नाही. आजही कर्तव्यदक्ष शिक्षकाला समाजात मान मिळतोच आजही स्वतःच्या व्यवसायावर निष्ठाठेवून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे प्रयोगशील शिक्षक आपल्या समाजात आहे. ही संख्या अधिकाधिक वाढावी यासाठी शिक्षक निष्ठावान असावा .

**बांधिलकी संकल्पना**

1. Commitment is a positive attitude towards someone, something or some principle. (Educational Dictionary 2000)
2. A Person who does his " Duty for duty sake"
   Benner (1984)
3. It is complete dedication and devotion ".
   (Singhas 2003)

बांधिलकी संदर्भात अनेक तज्ज्ञांनी आपले मत व्यक्त केले आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये सुद्धा याचा विचार झाला आहे. यात वचनबद्ध, उपासना, अर्पण असे शब्द यासाठी वापरण्यात आले आहेत. बांधिलकी ही भावनात्मक क्षेत्राशी निगडीत संकल्पना आहे. यामध्ये भावनिक गुंतवणूक महत्त्वाची मानली जाते. बांधिलकी ही एक व्यापक संकल्पना आहे. बांधिलकीवर अनेक घटकांचा परिणाम होत असतो. ही सापेक्ष संकल्पना आहे. असे म्हटले तरी चालेल.

**शिक्षकांची बांधिलकी** :

UNESCO ने १९९६ या अंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेमध्ये शिक्षकांमध्ये असणाऱ्या बांधिलकीचा सविस्तर विचार केला व शिक्षकांच्या बांधिलकीवर प्रश्नचिन्ह उभे केले.

**आजच्या शिक्षण प्रक्रियेच्या मुळाशी गुणवत्ता हा महत्त्वाचा घटक सर्वत्र चर्चेचा विषय झालेला आहे. शिक्षकांची गुणवत्ता, कामाची पद्धत, शिक्षक घडवण्याची प्रक्रियायांच्या मुळाशी गुणवत्ता याचा 'थेटसंबंध' जोडता आला तरी गुणवत्ता विकासासाठी शिक्षण प्रक्रियेतील गतिमानता अबाधित ठेवण्यासाठी शिक्षकांची बांधीलकी हा घटक महत्त्वाचा मानला गेला आहे.**

**Commited Teacher:-**

A commited Teacher is one who when employed as a Teacher commits or blind oneself to teaching i.e.to the duties and to the role of teacher and is bound to a certain behavior but not as if in a person.

(Mehrotra R.N. 2003)

**बांधिलकी युक्त शिक्षकही आजच्या काळाची गरज झाली आहे बांधिलकी युक्त शिक्षक संदर्भात मल्होत्रा यांनी थोडक्या शब्दात अर्थपूर्ण विवेचन केले आहे. जो शिक्षक आपले काम वचनबध्दतेने व अर्पण भावनेने करतो, त्यास बांधिलकीयुक्त शिक्षक असे म्हणता येईल. आपल्या जवळील सर्वक्षमता, कौशल्य आणि युक्तीपणाला लावून ठरवलेली ध्येये उद्दिष्टे गाठण्याच्या प्रयत्नाला खरी बांधिलकी म्हणता येईल.**

**स्वामी विवेकानंद बांधिलकीयुक्त शिक्षका संदर्भात म्हणतात की,**

The teacher must not teach with any ulterior. Selfishmotive for money, name or fame. His work must be simply out of pure love for mankind.

Swami Vivekanand (His call to the Nation Ed – 1965)

**मानवजातीच्या उत्कर्षासाठी आणि विकासासाठी तसेच शुद्धप्रेमापोटी काम असावे. यामध्ये कोणतेही बाह्य प्रलोभन असू नये. यालाच खरा बांधिलकीयुक्त शिक्षक म्हणतात. परंतु सध्याच्या आधुनिक युगात विवेकानंदांच्या या विधानाला विरुद्ध असं शिक्षकांचं वर्तन आहे, असं दिसून येते. शिक्षकांची बांधिलकीही शिक्षण प्रक्रियेमध्ये अत्यंत महत्वाची ठरते म्हणून.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**अभिवृत्ती**

↓

**कार्य समाधान**

↓

**बांधिलकी**


याप्रमाणे शिक्षकाचा प्रवास आपोआप होत असतो. शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेतील अध्र्वयू मानला जातो. त्यामुळे त्याच्या व्यवसायाप्रतीची बांधिलकी असणे अत्यंत

महत्वाचे ठरते. बांधिलकी म्हणजे स्वीकारलेल्या कामावर निष्ठा होय. आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी समर्पितवृत्तीने श्रम करणे व पुरेसा वेळ देण्याची शिक्षकाची तयारी म्हणजे बांधिलकी होय. शिक्षकी व्यवसायात अत्यावश्यक तो त्याग करण्याची भावना निर्माण होणे म्हणजे बांधिलकी होय. शिक्षकी व्यवसायात बांधिलकीने काम करण्याची निश्चित वेळ नसते. बांधिलकी हे मूल्य जोपासणारा शिक्षक सतत संशोधक वृत्तीची जोपासना करत नवनविन संदर्भ शोधत असतो.

"परिणामकारक अध्ययन-अध्यापन प्रक्रियायासाठी योग्य वातावरण निर्मिती व ती प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी शिक्षकाची आपल्या व्यवसायावर निष्ठा असणे यालाच व्यावसायिक बांधिलकी असे म्हणतात" शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या कामगिरीचे स्वरूप, निष्ठायातून व्यक्त होणारे व्यावसायिक अंग म्हणजे बांधिलकी होय. यशस्वी शिक्षक होण्यासाठी आपल्या कामाचे नेमके आकलन होणे गरजेचे आहे. त्या आकलनाचे प्रकटीकरण प्रत्यक्ष वर्तनातून दिसायला हवे असे अपेक्षित आहे. शिक्षकाची नीतिमत्ता, मूल्यवतत्त्वे यांच्याशी बांधिलकी असेल तर त्याच्यामध्ये आपल्या व्यवसायाविषयी हळूहळू बांधिलकी विकसित होत जाते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शिक्षकांच्या बांधिलकीची पाचक्षेत्र**




१. **विद्यार्थ्यांशी बांधिलकी** (Commitment to Learner)

२. **समाजाशी बांधिलकी** ( Commitment to Society)

३. **व्यवसायाशी बांधिलकी** ( Commitment to Profession)

४. **उत्कृष्टतेशी बांधिलकी** ( Commitment to achieve Excellence )

५. **मूलभूत मानवी मूल्यांशी बांधिलकी** ( Commitment to Basic Human Values )

**जेणे करून व्यक्तीला व्यक्तिगत व सामाजिक जीवनात सुख समाधान व यश प्राप्ती होते. त्याप्रमाणे शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरिता मुख्याध्यापक पर्यवेक्षक शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडावी म्हणून एन. सी. टी. ई. सांगितलेली शिक्षकांच्या बांधिलकी क्षेत्र महत्वाचे आहे.**

**विद्यार्थ्यांशी बांधिलकी** ः

**शिक्षकाने विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असावे. शिक्षकांचे शिक्षक म्हणून जे अस्तित्व असते तेच मुळी विद्यार्थ्यांवर अवलंबून असते. आपले सर्वकार्य हे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आहे. ते आपले कर्तव्य आहे त्यातच आपला आनंद आहे असे मानले पाहिजे.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**समाज बांधिलकी** ः

**शिक्षक हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा व जबाबदार घटक समजला जातो. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाचा स्थानिक समाजाशी वैयक्तिक व सामूहिक संबंध असतो. म्हणून शिक्षकाची भूमिकाही समाजनिष्ठ असावी. समाजातील विविध घटकांचा उपयोग करून घेण्यासाठी शिक्षकाने योग्य कार्यपद्धती आखून त्याप्रमाणे आचरण करावे.**

**व्यवसाय बांधिलकी** ः

**व्यवसाय कोणताही असो त्यावर आपली निष्ठा आणि प्रेम असेल तरच आपण त्यात स्वतःला गुंतवून घेऊन उत्तमरीतीने काम करू शकतो. आपल्या व्यवसायाची आंतरिक जाण व त्यातील आंतरिक निष्ठांचे पालन होण्यासाठी व्यवसाय निष्ठा व प्रेम अतिशय महत्त्व पूर्ण ठरते.**

**उत्कृष्टते बाबत बांधिलकी** ः

**शिक्षकाला नेहमीच उत्कृष्टतेचा ध्यास असावा. शिक्षकाने आपले ज्ञान व कौशल्य याचा वापर नेहमी उत्कृष्टता संपादनासाठी केला पाहिजे. शिक्षक प्रक्रियेत उत्कृष्टतेसंबंधीची बांधिलकी महत्त्वाची ठरते.**

**मूल्यबाबत बांधिलकी** ः

**आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात नीति मूल्यांची घसरण झाली आहे हे थांबवण्यामध्ये मूल्यनिष्ठ शिक्षक महत्वाची भूमिका ठरते. मूल्यनिष्ठ शिक्षक हे संस्कृती संरक्षणाचे संवर्धन व समाज स्वास्थ्य टिकवण्याचे काम करतात.**

संदर्भसूची ः☐

*१) पंडितवी., पाटीलना., मोरे ल. (२००९)शिक्षक शिक्षण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर*

*२) भोसले अ., डोणे उ. (२००९) शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, फडके पब्लिकेशन्स, कोल्हापूर*

*३) सोहनी चि. (२००८) अध्यापनाची प्रतीमाने, नित्यनूतन प्रकाशन, पुणे*

*४) सप्रेनी., पाटील प्री. (२००८) शिक्षणातील विचारप्रवाह, फडके प्रकाशन, कोल्हापूर*

*५)नरवरे म. (२००८)भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नित्यनूतन प्रकाशन, पुणे*

*6) Competency based and commitment oriented teacher education for quality school education (1998) New Delhi.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*